**पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर.**

**प्रेस नोट**

**दिनांक 11/03/2024**

सामान्य नागरिकांनी माहिती अधिकार कायद्यान्वये मागितलेली माहिती सुलभ व सोप्या पद्धतीने,मुदतीत मिळण्यासाठी व बदलत्या परिस्थितीचा साकल्याने व काळजीपूर्वक विचार करून पोलीस अधीक्षक, लातूर श्री.सोमय मुंडे यांनी माहिती अधिकार कायद्यान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून लातूर जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रातील विविध पोलीस अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी व प्रथम आपली अधिकारी म्हणून निर्देशित केले आहेत. तसे परिपत्रक आज दिनांक 11 मार्च 2024 रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून काढण्यात आले आहे.

यामध्ये पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व शाखेचे जन माहिती अधिकारी हे कार्यालय अधीक्षक असतील तर सर्व पोलीस ठाणे स्तरावर ठाणे प्रभारी अधिकारी हे जन माहिती अधिकारी असतील.संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी हे प्रथम अपिलय अधिकारी असतील.

तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयातील अंगुली मुद्रा शाखा, महिला सहाय्यक कक्ष-भरोसा सेल, आर्थिक गुन्हे शाखा, वाचक शाखा व ईत्यादी शाखा चे प्रभारी अधिकाऱ्यांना जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करण्यात आले असून प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पोलीस उपाधीक्षक (गृह) लातूर हे असतील.

उपविभागीय पोलीस अधिकारी,कार्यालयाचे जन माहिती अधिकारी हे संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी असतील तर प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून अपर पोलीस अधीक्षक लातूर यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे.

सदरची अंमलबजावणी 15 मार्च 2024 पासून करण्यात येणार आहे.

जनसर्पंक अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय,लातूर.